एक्सलसियर एज्युकेशन सोसायटी, कोपरी, जि.ठाणे संचलित बिम्स पॅराडाईज इंग्लिश हायस्कूल, कोपरी, जि.ठाणे शाळेचे देव कॉर्पोरा इमारत, कॅडबरी कंपनीसमोर, खोपट, जि.ठाणे येथे केलेल्या तात्पुरत्या स्थलांतरास कार्योत्तर मान्यतेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३३१६/प्र.क्र.३५६/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १२ जुलै, २०१९

वाचा :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांकः माशास्थ २०१२/(५९/१२)माशि-२, दिनांक ३१ जुलै, २०१३.

संदर्भ :- विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे क्र.शिउसं/माध्य-२/स्थलांतर/१८५/२०१६/१०८४-८५, दिनांक २२ डिसेंबर, २०१६ चे पत्र

प्रस्तावना :-

एक्सलसियर एज्युकेशन सोसायटी, कोपरी, जि.ठाणे संचलित बिम्स पॅराडाईज इंग्लिश हायस्कूल, कोपरी, जि.ठाणे या इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळेचे, देव कॉर्पोरा इमारत, कॅडबरी कंपनीसमोर, खोपट, जि.ठाणे येथे केलेल्या तात्पुरत्या स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

उपरोक्त शाळेची इमारत धोकादायक झाल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळेचे, सर्व भौतिक सुविधा उपलब्ध असलेल्या देव कॉर्पोरा इमारत, कॅडबरी कंपनीसमोर, खोपट, जि.ठाणे येथे इमारतीमध्ये तात्पुरते स्थलांतर केले आहे. सदर शाळेचे वर नमूद ठिकाणी केलेल्या स्थलांतरास खालील अटी व शर्तीवर कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. :-

(१) मुळ ठिकाणच्या जीर्ण इमारतीची दुरूस्ती/ बांधकाम पूर्ण होईपर्यंत सदर शाळा स्थलांतरीत ठिकाणी सुरू राहील. तसेच शाळेचे मुळ ठिकाणी स्थलांतर करण्यासाठी शासनाची पूर्वमान्यता आवश्यक राहील.

(२) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.

(३) या शाळेच्या स्थलांतराबाबत तक्रार नसल्याची तसेच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे समायोजन झाल्याची खात्री करण्यात यावी.

(४) स्थलांतरास सर्व शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांची सहमती असावी. तसेच सर्व पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना स्थलांतरित ठिकाणी सामावून घेण्यात आले आहे व त्यांच्या सेवाशर्तीमध्ये बदल करण्यात आलेले नाही याबाबत संस्थेच्या अध्यक्ष/ सचिवांचे रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(५) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार व शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार शाळेसाठी पक्की इमारत व सर्व भौतिक सुविधा आणि शैक्षणिक सुविधा

उपलब्ध करून देण्यात येतील. याबाबत संस्थेच्या अध्यक्ष/ सचिवांचे रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(६) शासनाकडून शाळा, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी, वेतन वेतनेत्तर अनुदान, विद्यार्थी इ. संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ. चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

(७) स्थलांतरीत शाळेच्या बाबतीत मूळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही.

(८) सदर शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर आहे, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी कार्यरत राहील.

(९) सदर शाळा ही इंग्रजी माध्यमाची कायम विनाअनुदानित तत्वावरील असल्याने त्यामध्ये कार्यरत शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे संपूर्ण दायित्व संस्थेवर राहील.

(१०) शाळेचे शासन मान्यतेशिवाय स्थलांतर करण्यात येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(११) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. वरील अट क्र.(४) व (५) ची पूर्तता झाल्यावर, विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांनी सदर शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याबाबत आवश्यक कार्यवाही ६ आठवडयात करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१२१६४७२३२९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.07.12 16:51:47 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत –

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई
३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे
४) अध्यक्ष/ सचिव, एक्सलसियर एज्युकेशन सोसायटी, कोपरी, जि.ठाणे
५) निवडनस्ती (एसएम-१).